कर्णाळं चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे.
नोंदणी क्र. : ई/८१७७/पुणे
ए-११, राहूल कॉम्प्लेक्स, पौड रोड, कोथरूड, पुणे ४११०३८.
* मो. : ९८८१३७३५८५ * ईमेल : chandrakantshahasane@gmail.com

# कार्य अहवाल




**वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि पर्यावरण रक्षण ही देखील राष्ट्रभक्ती आहे!**



भारतीय क्रांतिवीरांनी चेतविलेल्या बलिदानाच्या ज्योतीचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी कर्नाळा प्रकाशन व कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेची उभारणी करणारे

**कै. शांताराम भाऊशेट शहासने**

## कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त



श्री. चंद्रकांत शहासने



सौ. मंजिरी शहासने



ॲड. नंदिनी शहासने

## राज्यस्तरिय राष्ट्रभक्ती साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व स्वागताध्यक्ष



१ ले संमेलनाध्यक्ष
श्री. रंगनाथ नाईकडे



१ ल्या स्वागताध्यक्षा
श्रीमती मंदाताई नाईक




२ रे संमेलनाध्यक्ष
श्री. शरदश्चंद्र दराडे पाटील



२ ऱ्या स्वागताध्यक्षा
सौ. उर्मिला कराडकर



३ रे संमेलनाध्यक्षा
डॉ. जयश्री तोडकर



३ रे स्वागताध्यक्ष
श्री. सुरेशराव कोते



४ थे संमेलनाध्यक्ष
डॉ. रामचंद्र देखणे



४ थे स्वागताध्यक्ष
डॉ. बबनराव जोदंड

कर्नाळा™ चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे. नोंदणी क्र. : ई/८१७७/पुणे
आयकर विभागाच्या कलम १२ए आणि ८०जी अंतर्गत सवलतपात्र
ए-११, राहूल कॉम्प्लेक्स, पौड रोड, कोथरूड, पुणे ४११०३८.
* मो. : ९८८१३७३५८५ * ईमेल : chandrakantshahasane@gmail.com

# कार्य विवरण अहवाल

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट ही संस्था बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अंतर्गत नोंदवलेली आहे. विविध सामाजिक उपक्रमांतून राष्ट्रीय ऐक्य, एकात्मता, बंधुभाव आणि देशभक्ती या नैतिक मूल्याचा प्रसार समाजात करणे हे संस्थेचे ध्येय आहे. सदर ट्रस्ट विविध उपक्रम राबवते जसे –

१. शिक्षण, कला, साहित्य आणि भारतीय संस्कृतीला प्रोत्साहन देणे

२. शालेय विद्यार्थ्यांत देशभक्ती, राष्ट्रीय ऐक्य, देशप्रेम, चारित्र्य बांधणी आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी कार्यक्रम राबवणे

३. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण आणि शैक्षणिक साहित्याची मदत करणे

४. राष्ट्र उभारणीस पूरक ठरतील अशी साहित्य संमेलने, सांस्कृतिक कार्यक्रम, जागरूकता उपक्रम, चर्चासत्रे, प्रदर्शने, प्रशिक्षणे आयोजित करणे

५. आरोग्य आणि आरोग्य जागृती शिबिरे, कपडे गोळा करण्यासाठी शिबिरे, आपत्ती व्यवस्थापन जागरूकता कार्यक्रम आयोजित करणे

६. ट्रस्टच्या उद्देशांना पूरक माहिती प्रसिद्ध करून तिचा प्रचार करणे

७. नैसर्गिक आपत्तीच्या परिस्थितीत मदतीची तजवीज करणे

८. वृद्धाश्रम, महिलाश्रम, अनाथालये, विकलांग केंद्रे स्थापन करणे

९. न्यासाच्या उद्दीष्टांस पूरक शासकीय योजना राबवणे आणि समान उद्दीष्ट असलेल्या संस्थांना मदत करणे.

१०. लहान मुलांना देशप्रेम आणि देशभक्तीचे धडे देणे, सुसंस्कृत नागरिक बनवण्याच्या हेतूने निरपेक्ष वृत्तीने काम करणे.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टला दिलेल्या देणग्या ८० जी अंतर्गत आयकर सवलतीस पात्र आहेत.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट शालेय विद्यार्थ्यांना नजरेसमोर ठेऊन, त्यांना समजेल, रस वाटेल अशा सोप्या भाषेत भारतीय स्वातंत्र्य लढा आणि इतर प्रेरणादायी गोष्टींची पुस्तके छापते. हीच बाब कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टला इतर संस्थांपेक्षा वेगळं ठरवते. वैश्विक शांती, सुसंवाद आणि स्थैर्यासाठी मानवतावादी दृष्टीकोन आणि नीतिमूल्य असलेला समाज अत्यावश्यक आहे. यासाठी लहान मुलांमधे हे गुण विकसित करून त्यांना सुजाण नागरिक बनवणे हे कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टचे उद्दिष्ट आहे. ट्रस्ट सन २००० पासून कार्यरत आहे. ट्रस्टने केलेली कामे खालील प्रमाणे

१. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्यासाठी, चारित्र्यसंवर्धन, राष्ट्रीय ऐक्य, एकात्मता, बंधुभाव आणि देशभक्ती याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी त्या विषयांवरील पुस्तके, नियतकालिके प्रकाशित करण्याचे काम कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट करते. या अंतर्गत आतापर्यंत ४०हून अधिक पुस्तके प्रकाशित केलेली आहेत.

२. २०१८ पासून दरवर्षी कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती साहित्य संमेलन आयोजित करत आहे. **‘वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि पर्यावरण रक्षण ही देखील राष्ट्रभक्ती आहे’** ही या संमेलनामगाची प्रमुख संकल्पना आहे. या संमेलनाच्या निमित्ताने विविध सामाजिक प्रश्नांवर भाष्य करणारी पुस्तके प्रकाशित केली जातात. यासाठी न्यासाला महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळाचे अनुदानही मिळालेले आहे.

३. प्रदर्शने, चर्चासत्रे आणि साहित्य संमेलने : राष्ट्रउभारणी आणि भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासाचा प्रसार हे उद्देश समोर ठेऊन निरनिराळी प्रदर्शने, चर्चासत्रे, साहित्य संमेलने आयोजित करते. भारतीय स्वातंत्र्य लढ्याची सचित्र माहिती या प्रदर्शनांतून मांडली जाते.

# विद्यार्थी चारित्र्य संवर्धन व मार्गदर्शन

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टच्या विद्यमाने आयोजित

राज्यस्तरीय स्वातंत्र्यवीर सावरकर साहित्य संमेलन २०१६ **भगूर येथे जमलेला चार हजार विद्यार्थ्यांचा समूह**



**दिनांक : ५/०६/२०१९** रोजी पर्यावरणदिनाच्या निमित्ताने आरोग्य पर्यावरण आणि शाकाहार याचे महत्त्व सांगणाऱ्या 'निरोगी आरोग्याची गुरुकिल्ली' या चंद्रकांत शहासने लिखित पुस्तकाचे वाटप नंदादीप एज्युकेशन सोसायटी येथे विद्यार्थ्यांना करण्यात आले.







**दिनांक २६/०४/२०१९ :** पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता प्रसारकार्यात सहभाग घेणाऱ्या पुणे येथील एम.आय.टी. हायस्कूल, कोथरूडमधील विद्यार्थ्यांना पर्यावरण मित्र प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांचा गौरव वनसंरक्षक श्री. रंगनाथ नाईकडे (आय.एफ.एस), सौ.उर्मिलाताई कराड (ज्येष्ठ कवयित्री व चरित्र लेखिका) आणि कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त चंद्रकांत शहासने यांच्या शुभहस्ते करण्यात आला.





# एड्सपासून सावधानी : विद्यार्थी जनजागरण






**कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टच्या विद्यमाने चिपळूण येथे आयोजित व्यसनमुक्ती प्रसार कार्यक्रमात समाजसेविका कै. सौ. निर्मलाताई चिंगळे.**




## विद्यार्थ्यांना खाऊ वाटप

मुलांना खाऊ वाटप करताना कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टच्या प्रमुख विश्वस्त मंजिरी शहासने, तत्कालीन नगरसेवक मुरलीधर मोहोळ (सध्याचे पुण्याचे महापौर) व ट्रस्टचे विश्वस्त चंद्रकांत शहासने.



## वक्तृत्व स्पर्धेत पुरस्कार प्रदान करताना




## राष्ट्रभक्ती प्रसार अभियानांतर्गत विद्यार्थ्यांचा सहभाग



# कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टच्या विद्यमाने लोणावळा येथे आयोजित विद्यार्थी चारित्र्य संवर्धन कार्यक्रम







# साहित्य संमेलने

**सन २०१० :** पोर्ट ब्लेअर, अंदमान येथे संस्थेच्या विद्यमाने स्वातंत्र्यवीर सावरकर, मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.




संमेलनाची स्मरणिका

## **४ जून २०११ :** पोर्ट ब्लेअर, अंदमान येथे 'सावरकर पदस्पर्श शताब्दी सोहळा'



पोर्टब्लेअर (अंदमान) सेल्युलर जेलच्या प्रांगणातील पिंपळाचे झाड हे देशभक्त क्रांतिकारकांची स्मृती जपत आहे. कर्नाळा चॅरीटेबल ट्रस्टच्या विद्यमाने देशभक्तांना सार्वत्रिक श्रद्धांजली वाहण्याचे उद्देशाने भारतातील व भारताबाहेरील, जगभरातील तीनशे नद्यांचे पवित्र जल एकत्रित करून या पवित्र जलाचा जलाभिषेक पिंपळाच्या पवित्र वृक्षावर करण्यात आला. २०१८साली जलाभिषेक परिषदेचे आयोजन पत्रकार तेजाली शहासने यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.



# भगूर साहित्य संमेलन


२६ फेब्रुवारी २०१६ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आत्मार्पण दिनास ५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने सावरकरांच्या जन्मगावी, भगूर येथे कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टच्या विद्यमाने स्वातंत्र्यवीर सावरकर साहित्य संमेलनाचे आयोजन, देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.






राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक प.पू. केशव बळीराम हेडगेवार यांचे जीवन चरित्र अर्थात 'केशवप्रताप' या महाकाव्याचे प्रकाशन सन्माननीय श्रीमती सुमित्राताई महाजन, (माजी सभापती, भारत सरकार) यांच्या शुभहस्ते ३०/०६/२०१९ रोजी पुणे येथे झाले.






२१ व्या शतकातील दुसरे ओवीबद्ध महाकाव्य - ओवी संख्या ७०००

# पहिले राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती साहित्य संमेलन, २०१८

**या संमेलनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने अनुदान मिळाले.**

**ग्रंथदिंडी**



संमेलनाचे उद्घाटनप्रसंगी अजानवृक्षाचे पूजन पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि पर्यावरण रक्षण ही राष्ट्रभक्ती आहे. असा ऐतिहासीक संदेश देण्यात आला



पहिल्या राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती साहित्य संमेलनाचे प्रमुख अतिथी पद्मभूषण विजय भटकर यांचा सत्कार याप्रसंगी विश्वस्त नंदिनी शहासने, रंगनाथ नाईकडे (अध्यक्ष) व डॉ. सुधाताई कांकरिया




स्मरणिकेचे प्रकाशन करताना मान्यवर



# दुसरे राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती साहित्य संमेलन, २०१९

दुसरे राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती साहित्य संमेलन माननीय शरदश्चंद्र दराडे पाटील, डीन एम.आय.टी. कॉलेज, पुणे यांचे अध्यक्षतेखाली डिसेंबर २०१९ मध्ये संपन्न झाले.




स्मरणिकेचे प्रकाशन करताना मान्यवर



क्रांतिकारकांच्या छायाचित्रांचे प्रदर्शनाचे उद्घाटन करताना मान्यवर



क्रांतिकारकांच्या छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे अवलोकन करताना मान्यवर



ग्रंथदिंडीसह विश्वस्त ॲड. नंदिनी शहासने व चंद्रकांत शहासने



ग्रंथदिंडीत रममाण झालेले वारकरी



# तिसरे राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती साहित्य संमेलन, २०२०

भारतमाता पूजन करताना मान्यवर



नेत्रतज्ज्ञ डॉ. हेमंत तोडकर यांचा सत्कार करताना डॉ. जयश्री तोडकर, श्री. रंगनाथ नाईकडे




स्मरणिकेचे प्रकाशन करताना मान्यवर




कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नियम पाळून संमेलन संपन्न झाले



कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त चंद्रकांत शहासने यांनी रचिलेले
२१ व्या शतकातील पहिले महाकाव्य - ओवी संख्या ३५००






कर्नाळा चॅरिटेबलचे ट्रस्टने प्रकाशित केलेली पुस्तके






देशभक्तकोश या ग्रंथाचे प्रकाशन करताना शिवशाहिर कै. बाबासाहेब पुरंदरे


## कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टने प्रकाशित केलेली पुस्तके
































संत गाडगे महाराज

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

भारतीय गोवंश

॥ देशभक्त कोश ॥


सलाम मृत्युंजयांना



धाडसी
गिरीजा

बालवीरांचे कर्मवीर
सतीश हाके
पराग शिवदास

राष्ट्रीय कीर्तन
* वंदन करूया भारत देशा
* मी १८५७ बोलतोय *
– चंद्रकांत शहासने
– अनुपमा हुद्दार



वामन नारायण जोशी (दाजी)



भारताचा
सुवर्णस्पर्शी इतिहास



भले बुद्धीचे सागर ...
नाना



राजमाता जिजाऊ
झाशीची राणी
कल्पना चावला


राष्ट्रभक्ती प्रचार अभियान
२०१० – २०११
चार ग्रंथांचा संच
My Life Imprisonment


Freedom Struggle
The Untold Aspects


दादरा नगर हवेली
मुक्ती संग्राम


भले बुद्धीचे सागर
...नाना


साने गुरुजी

# क्रांतीवीरांचे सचित्र प्रदर्शन



संस्थापक : कै. शांताराम भाऊशेठ शहासने



क्रांतिकारकांच्या प्रदर्शनाचे अवलोकन करताना रा. स्व. संघाचे सरसंघचालक श्री. सुदर्शनजी



राष्ट्रभक्ती प्रसार अभियानांतर्गत ग्रंथ प्रकाशन करताना श्री. सुदर्शनजी

देशभक्तकोश भेट सप्रेम भेट : काकोरी कटातील क्रांतीवीर अश्पाकउल्ला खान यांचे नातू तसेच खा. इंद्रेश आणि खा.  शाहनवाझ हुसेन



ग्रंथप्रदर्शनास खा. चंद्रकांत खैरे यांची भेट



## कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांचा संयुक्त विद्यमाने कायदेविषयक जनजागृती उपक्रम -

१. अंतर्गत पारधी, कोल्हाटी आणि तत्सम भटक्या विमुक्त समाजाच्या कुटुंबीयांना सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळण्यासाठी 'ओळखीचा आधार' याविषयी चर्चासत्राचे आयोजन दि. १९. ०७. २०२१ रोजी, पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या 'पुनरुत्थान समरसता गुरुकुलम्', चिंचवड येथे करण्यात आले. या वेळी जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाचे सचिव श्री. प्रताप सावंत, स्थायी लोकन्यायालय, पुणे जिल्हा न्यायालयचे सदस्य श्री. रवींद्र बिडकर, विधिज्ञ सतीश गोरडे, विधिज्ञ सुहास पडवळ हे उपस्थित होते.

२. पुणे जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्री. संजय देशमुख तसेच श्री. रविकुमार बीडकर, (सदस्य - स्थायी लोक न्यायालय, पुणे) यांची विनामूल्य कायदेविषयक मार्गदर्शन कसे मिळवता येईल याबद्दलची मुलाखत ट्रस्टच्या फेसबुक, इन्स्टाग्राम आणि यू ट्यूब पेजवर प्रसारित करण्यात आली.





# भटक्या विमुक्तांना विविध दाखल्यांसाठी शिबिर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २१ - पारधी, कोल्हाटी अशा भटक्या विमुक्त जमातींच्या नागरिकांना आधार कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, जातीचा दाखला काढण्यासाठी विशेष शिबिर घेणार, अशी माहिती पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रताप सावंत यांनी दिली.

या नागरिकांना सामाजिक सुरक्षा योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे आणि कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टच्या, पुणेच्या वतीने ओळखीचा आधार [illegible] कार्यक्रमाचे आयोजन केले होते. चिंचवड येथील पुनरुत्थान समरसता गुरुकुलम येथे झालेल्या कार्यक्रमात सावंत बोलत होते. प्रमुख जिल्हा न्यायाधीश देशमुख यांनी नियोजनासाठी मदत केली. कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टच्या ॲड. नंदिनी शहासने, स्थायी लोकन्यायालय पुणेचे सदस्य रविकुमार बिडकर, ॲड. सतीश गोरडे, ॲड. सुहास पडवळ यांनी

**विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रताप सावंत यांची माहिती**

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. गुरुकुलमचे गिरीश प्रभुणे म्हणाले, 'भटकंती, गैरसमज गरिबी, निरक्षरता, जन्माचे दाखले नसणे, कुठलेही ओळखपत्र नसल्यामुळे या समाजातील लोकांना शैक्षणिक सहाय आणि योजनांचा लाभ मिळत नाही.'



दिनांक ५ जून २०२१ रोजी पर्यावरण दिनानिमित्त कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून 'वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण रक्षण याबद्दल जनजागृतीसाठी' अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरणदिनाच्या निमित्ताने एक देशी झाडाचे रोप लावून त्याचे संगोपन करण्याची शपथ घेण्याचे व्हिडिओ पाठवण्यासाठी आवाहन करण्यात आले. त्याला भरघोस प्रतिसाद मिळाला. 'पर्यावरण रक्षण हीच राष्ट्रभक्ती' या विचाराचा प्रसार करण्यास संस्थेला यश मिळाले.













पर्यावरण दिन ५ जून २०२१ ते २१ सप्टेंबर २०२१ वन हुतात्मा दिन असे ९९ दिवसांचे औचित्य साधून समाज माध्यमांवर शंभर पर्यावरण विषयक लेखांची लेखमाला चालवण्यात आली या लेखांचे एकत्रित पुस्तक पर्यावरण विषयक जनजागृती या लेखांचे एकत्रित संकलन करून पर्यावरण विचार या पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल महामहिम श्री. भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पर्यावरण मित्र पुरस्कार प्रदान करण्यात आले.






पर्यावरण विचार हा ग्रंथ विद्यार्थ्यांना सप्रेम भेट देण्यात आला.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टला दिलेल्या देणग्या ८० जी अंतर्गत आयकर सवलतीस पात्र आहेत.




ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून प्रकाशित केलेले ध्वनि पुस्तक (ऑडियो बुक)



" स्वधर्म आणि स्वराष्ट्राच्या भावना दडपण्याचा निर्लज्ज प्रकार जेव्हा राज्यसत्ता करते तेव्हा अंतःकरणातील प्राण बलीवेदीचा वेध करण्यासाठी तयार होतात. "
बलिदानाचा इतिहास




THE STAMPS PUBLISHED BY DEPARTMENT OF POSTS INDIA. IN THE MEMORY OF THE
Revolutionaries And Freedom Fighters
Sant Tukaram
Sarat Chandra Bose
Sardar Vallabhbhai Patel
Satis Chandra Samanta
Sayaji Rao Gaekwad
Shaikh Mohmad Abdulla
Shamji Krishna Varma
Shivprasad Gupt
Shyama Prasad Mookerjee
Shyamlal Gupt Parshad
KARNALA CHARITABLE TRUST, THANE , PH. 9322269721.
RAHUL COMPLEX. A/11, PAUD ROAD. PUNE.